# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक १७/०४/२०१७

## दु ११.३० वा.

| अनु. क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील मा. स्थायी समिती सभा दिनांक ०३/०४/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.** | **ठराव** :- मागील मा. स्थायी समिती सभा दिनांक ०३/०४/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत आले.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २ | **महानगरपालिका हद्दीतील अंगणवाडींना वजन काटे पुरवठा करणे कामी प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत.** | **ठराव** :- महिला बालकल्याण समिती शिफारशीनुसार अंगणवाडीकरीता लहान मुलांचा वजनकाटा व गरोदर मातांच्या वजनाकरीता वजन काटा असे एकुण २ वजनकाटे पुरविणेबाबत शिफारस करण्यांत आली आहे. मागणीनुसार २ काटे ऐवजी गरोदर मातांच्या वजनाकरीता अंदाजे १५० किलो वजन क्षमतेचा वजनकाटा खरेदी करुन अंगणवाडींना पुरवठा करण्यांत यावा. तूर्त लहान मुलांच्या वजनाचा वजनकाटा अंगणवाडींना पुरवठा करु नये, असे मा. स्थायी समितीने सुचित केले आहे. करीता ई - निविदा प्रक्रिया करुन वजन काटे खरेदी करण्यांत यावे व याकामी अंदाजे येणाऱ्या ८,४२,०००/- रु. खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३ | **वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांकरिता पारंपारिक वस्तूंच्या (आगोठीच्या वस्तुंच्या) बाजारपेठ उपलब्ध करुन देणे करिता प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत.** | **ठराव** :- महिलांना व्यवसाय प्राप्त होण्याच्या दृष्टीने सदर योजना उपयोगी असून साठवणुकीची बाजारपेठ उपलब्ध करुन दिल्यास व्यवसाय प्राप्त होऊ शकतो. याकरीता महानगरपालिका हद्दीत अंदाजे ५ ठिकाणी सदर बाजारपेठांचे आयोजन करण्यांत यावे. याकरीता मा. महिला व बालकल्याण सभापती व सदस्य यांनी सुचविलेल्या तारखेनुसार नियोजन करण्यांत यावे. या करीता महानगरपालिका हद्दीत विविध ५ ठिकाणी या बाजारपेठांचे आयोजन करण्यांत यावे. या कामी एका बाजारपेठेच्या ठिकाणी अंदाजे ६ x ६ चे २० ते २५ स्टॉल उभारणे, मंडप, स्टेज,लाईटची सोय, टेबले, खुर्च्या, जनरेटर, पिण्याच्या पाण्याची सोय महानगरपालिकेच्या मंजुर ठेकेदारामार्फत कार्यक्रमासाठी पुरवठा करण्यांत यावे. एका बाजारपेठेचा कालावधी अंदाजे ५ दिवसांकरीता राहिल. या कामी अंदाजे येणाऱ्या १५,००,०००/- रु. खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ४ | **महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी बालमेळावे आयोजित करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मंजुरी बाबत.** | **ठराव :-** महिला बालकल्याण समितीने शिफारस केल्यानुसार महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी बालमेळावे आयोजन करण्यांत यावे. बालमेळाव्याच्या आयोजनाच्या ठिकाणीबाबत मा.सभापती व मा.नगरसेवक यांच्या सुचनेनुसार ठिकाण व वेळेत बदल करण्यांत यावा. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत कार्यक्रमाच्या ठिकाणी साफ-सफाई करण्याकरीता सफाई कर्मचारी नेमणूक करण्यात यावे. तसेच मुलांच्या सोयी करीता आरोग्य विभागामार्फत फिरते शौचालयाची व्यवस्था करण्यांत यावी. याकामी ई-निविदा प्रक्रिया करुन इच्छुक ठेकेदार/खाजगी संस्था यांचेमार्फत साहित्य उपलब्ध करुन कार्यक्रमाचे आयोजन करणे करीता अंदाजे येणाऱ्या ३१,५०,०००/- रु. खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५ | **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून आलेल्या प्रशिक्षणार्थींना महानगरपालिकेत प्रशिक्षणार्थी म्हणुन घेऊन पाठयवेतन अदा करणे बाबत.** | **ठराव** :- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने ऑनलाईन प्रक्रियेद्वारे वसई-विरार महानगरपालिकेचे रजिस्ट्रेशन करुन ड्राफ्टसमन - १०, प्लंबर - २० व पंप ऑपरेटर - ०४ अशी एकुण ५४ पदे प्रशिक्षणार्थीसाठी निश्चित केली आहेत. ड्राफ्टसमन प्रशिक्षणार्थींची - १० पदे रिक्त आहेत. प्लंबर पदावर ७ प्रशिक्षणार्थी कार्यरत असून १३ पदे रिक्त आहेत, तर वायरमन पदासाठी निश्चित केलेल्या जागांसाठी २० पदे रिक्त आहेत. रिक्त पदांपेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींची आवेदन प्राप्त झाल्यामुळे प्रथम आवेदन सादर केलेल्या प्रशिक्षणार्थींना नेमणुक देणे योग्य होईल, असा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे. सदरबाबत साधक बाधक चर्चा करण्यात आली, रिक्त पदांपेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींची आवेदन प्राप्त झाल्याने प्रथम आवेदन प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थींस नेमणुक करण्याऐवजी आवेदने प्राप्त झालेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेवुन रिक्त जागांच्या मर्यादेत गुणवत्तेवर उमेदवारांची नेमणुक करावी, असे निर्देश ही स्थायी सभा देत आहे. प्रशिक्षणार्थीस प्रथम वर्षी किमान वेतनाच्या ७०% व द्वितीय वर्षी किमान वेतनाच्या ८०% प्रमाणे पाठयवेतन अदा करणेस आजची हि स्थायी सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६ | **प्रभाग समिती एफ (जुना ब) क्षेत्रातील पेल्हार शिर्डी नगर बाबू यांचे घर ते रंङ्ारे यांच्या घरापर्यंत पाथवे करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणे बाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे.आर.के.कॉन्ट्रेक्टर यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) ०.५०% जास्त दराने ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ७ | **प्रभाग समिती ब पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पुर्व येथील पाच आंबा येथे पाण्याच्या टाकी खाली कंपाऊंड वॉल बांधणे व परिसर काँक्रीटीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस मान्यता मिळणे बाबत.** | **ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ३१७ दि. २०/०४/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.श्री. बालाजी कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ५.१२% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८ | **जेष्ठ नागरीक सेवा मंडळ, माणिकपूर यांना वार्षिक अनुदान देणेबाबत.** | **ठराव :-** उपरोक्त विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार प्रस्तावातील नमुद ज्येष्ठ नागरीक सेवा मंडळ, या जेष्ठ नागरीक संस्थेला सन २०१६-१७ या वर्षाकरीता वार्षिक अनुदान रक्कम रू. १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष रुपये म ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९ | **प्रभाग समिती (आय) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.८१ मधील डायस आणि परेरा नगर मधील विजय पार्क येथील रस्ता साईड पट्टीसह डांबरीकरण करणे. (फेरनिविदा) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणे बाबत.** | **ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ४०९ दि. ३१/०७/२०१४ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. एम.ई. प्रोजेस्ट प्रा.लि. ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ०३.४०% जास्त दराने लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १० | **प्रभाग समिती (आय) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८९ मधील पाचुबंदर/किल्लाबंदर येथील उर्वरीत नाल्याचे बांधकाम करणे (फेज/२) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस मान्यता मिळणे बाबत.** | **ठराव :-** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६ दि. १४/०१/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. आर.ॲन्ड बी इन्फ्रा प्रो.प्रा.लि. ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) १५.००% जास्त (वाटाघाटीने ५.००% जास्त) दराने लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ११ | **प्रभाग समिती आय कार्क्षेजातील वॉर्ड क्र.८९ मधील पाचुबंदर/किल्लाबंदर नाल्यातील गाळ काढणे. या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४४ दि. २०/०४/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. मॅनदिप एंटरप्रायजेस ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ३.००% कमी दराने लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२ | **प्रभाग समिती ड वॉर्ड नं.७८ (१०५) मध्ये गणेश नगर येथील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. कामी संविदा करणेबाबत.** | **ठराव :-** उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची मी. धनेश्वर भोईर यांची १.८९% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीची शिफारस केली आहे.<br><br>तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे.धनेश्वर भोईर यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १३ | **वसई-विरार शहर महानगरपालिका कर्मचारी करीता क्रिकेट सामने भरविणे व त्याकामी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कर्मचारी करीता क्रिकेटचे सामने आयोजित करणेंस ही सभा मंजूरी देत आहे. त्याप्रमाणे सदरचे सामने आयोजित करतांना सन्मा.नगरसेवक व सन्मा नगरसेविका यांचे देखील संघ सामावून घेण्यांत यावा. तरी सदरचे क्रिकेट सामने आयोजित करणेंस व त्याकामी होणाऱ्या रु. ३ लक्ष इतक्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४ | **नगररचना विभागाकरीता १० Auto CAD सॉफ्टवेअर कंद्र शासनाच्या DGSnD दर कराराद्वारे (Rate Contract) खरेदी करणेसच्या कामाच्या संविदेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार प्रस्तावात नमुद कामासाठी M/s RESSEAUX TECH PVT.LTD. ह्या कंपनीशी संविदा करणेस कामाचा कार्यादेश देणेस व झालेल्या कामाचे देयक अदा करणेंस आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |